# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड** **दिनांक १४/०६/२०१८**

## १)घरफोडी :-

**अ) नांदेड ग्रामीण :-** दिनांक ३१.०५.२०१८ रोजी चे १६.३० ते दि. ०२.०६.२०१८ चे ११.४५ वा. चे दरम्यान, हिरो शोरुमचे समोर दुकान नं-२५, गोडाऊन ते लातुर फाटा रोडवर सिडको नांदेड येथे, अज्ञात चोरटयाने गोडाऊन चे पाठीमागील शटरचे लॉक तोडुन, शेटर वाकवुन आत प्रवेश करुन किराणा सामान अंदाजे किंमत ७२,०००/-रुपयचा माल चोरुन नेला. वगैर **फिर्यादी मो. आरिफ मो. अहमद, वय २९ वर्षे व्यवसाय व्यापार रा. BSNL ऑफिसचे जवळ, देगलुर नाका, ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. नांदेड ग्रामीण** गुरनं. २४०/२०१८ कलम ४५४, ४५७, ३८०, भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास मपोउपनी/ कावळे मॅडम, मो.क्रं. ०२४६२-२२६३७३** हे करीत आहेत.

**ब) इतवारा :-** दिनांक ११.०६.२०१८ रोजी चे २०.०० ते दि. १३.०६.२०१८ चे १२.३० वा. चे दरम्यान, फिर्यादीचे दुकानात महात्मा गांधी रोड नांदेड येथे, अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे राजयोग टेक्सटाईल व श्रीराम जयराम गंगमवार नावाचे कापड दुकानाचे लोखंडी टिन कापुन दुकानात प्रवेश करुन कपाटाचे लॉक तोडुन आतील २,०००/-रुपये चोरुन नेले. वगैर **फिर्यादी गणेश पि. श्रीराम गंगमवार, वय ५५ वर्षे व्यवसाय व्यापार रा. कौठा नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. इतवारा** गुरनं. १५८/२०१८ कलम ४५४, ४५७, ३८०, भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/२४३४ कऱ्हाळे, मो.क्रं. ०२४६२-२३६५१०** हे करीत आहेत.

## २ ) वाळु चोरी

**इस्लापुर :-** दिनांक ०१.०६.२०१८ रोजीचे रात्री ०१.३० वा. चे सुमारास, रविंद्र पाटील यांचे राहाते घरासमोर नंदगाव तांडा ता. किनवट जि. नांदेड येथे यातील आरोपीतांनी आपले ट्रॅक्टर क्रमांक एम. एच. २९/व्ही-९७५ मध्ये बिना परवाना बेकायदेशिररीत्या रेती भरुन ट्रॅक्टर हेड ट्रॉली वाळुसह किंमत ३,५०,०००/-रुपयाचे चोरुन नेत असताना मिळुन आले असता नंदगाव तलाठी सजा श्री शेळके यांनी पोलीस पाटील नंदगाव यांचे ताब्यात दिले असता आरोपीनी सदर रेतीचे ट्रॅक्टर चोरुन नेत असताना त्यांना आवाज देवुन थांबविण्याचा प्रयत्न केला असता तो नं थांबविता चोरुन घेवुन पळुन गेले. व सरकारी कामात अडथळा केला. वगैरे **फिर्यादी रविंद्र उमला राठोड वय ४७ वर्षे व्यवसाय पोलीस पाटील रा. नंदगांव तांडा ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. इस्लापुर** गुरनं २९/२०१८ कलम ३५३, ३७९ भादवी सह कलम गौण खनिज अधिनियम व १९५७ चे २०, १, ३, कायदयाप्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/१५२६ निवळे , मो.नं. ९४२३४३१५२६** हे करीत आहेत.

## ३) विवाहितेचा छळ :-

**धर्माबाद :-** दिनांक ०७.०२.२०१३ त आज पावेतो सासरी आदर्शनगर निजामाबाद तेलंगना व धर्माबाद जि. नांदेड येथे यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादी महीलेस तुझ्या नवऱ्याला गुत्तेदारी करावयाची आहे. त्यासाठी माहेरहुन ५,००,०००/-रुपये घेवुन ये म्हणुन फिर्यादीचा मानसिक व शारीरीक छळ करुन शिवीगाळ केली. तिचे पाय धरुन ओढुन फॅक्चर केले व जिवंत जाळुन मारण्याची धमकी दिली. वगैरे **२८ वर्षीय फिर्यादी महीलेने** दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. धर्माबाद** गुरनं. १३२/२०१८ कलम ४९८(अ),३२५, ५०६, ३४ भादविप्रमाणे गनुहा दाखल असून **तपास पोहेकॉ/१८४१ रेणके, मो.क्र. ९८२३९९१८४१** हे करीत आहेत.

## ४) फसवणुक :-

**कुंडलवाडी :-** दिनांक २४.०४.२०१८ चे १६.१५ वा. चे पुर्वी मारोती गुणाजी कदम यांचे शासनमान्य रेती घाटावर मौजे चिरली शिवार ता. बिलोली जि. नांदेड येथे यातील अरोपीस मा. जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन गौण खनीज वाहतुक पावती पुस्तक दिले असतांना आरोपीने तशाच प्रकारचे बनावट / बोगस पावती बुक बनवुन गौण खनिज वाहतुकीसाठी वापर केला. व शासनाची फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी अशोक दिगांबर गिरी , वय ३८ वर्षे व्यवसाय नौकरी तलाठी सज्जा पिंपळगाव रा. आधार चौक हदगाव ह. मु. छत्रपती चौक नांदेड.** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. कुंडलवाडी** गुरनं ४१/२०१८ कलम ४२०,४६४, ४६५, ४६७, ४६८, ४७१, भादवी अन्वये गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/यु. एस. भापकर, मो.क्रं. ९८२१६९५०५१** हे करीत आहेत.

## ५) मीलन नावाचा मटका :-

**अ)इतवारा :-** दिनांक १३.०६.२०१८ रोजी चे १४.३० वा. चे सुमारास, खुबा हॉटेलच्या मागे केळी संशोधन केंद्राचे गायरान देगलुर नाका नांदेड येथे यातील नमुद आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या आकडयावर पैसे लावुन मिलन नावाचा मटका खेळत व खेळवित असताना १,२२०/-रुपयाचे मालासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/११३३ गणपत कोंडाजी पेदे, ने. पो. स्टे. इतवारा** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.इतवारा** गुरन. १५६/२०१८ कलम १२ (अ) मजुका अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/११३३ पेदे, मो.क्र. ९०४९९४५६९४** हे करीत आहेत.

**ब)भाग्यनगर :-** दिनांक १३.०६.२०१८ रोजी चे १७.०० वा. चे सुमारास, तरोडा नाका चंदनानी ड्रेसेस नांदेड येथे यातील नमुद आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या आकडयावर पैसे लावुन मटका खेळत व खेळवित असताना ४,२५०/-रुपयाचे मालासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/चितरंजन ग्यानोबा ढेमकेवाड, ने. पो. स्टे. भाग्यनगर** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.भाग्यनगर** गुरन. १७२/२०१८ कलम १२ (अ) मजुका अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास पोना/७० एस. एम. गायकवाड, मो.क्र. ९८२३२२६७१४** हे करीत आहेत.

## ६) नदीचे पाण्यात बुडून आकस्मात मृत्यु :-

**नायगांव :-** दिनांक १३.०६.२०१८ रोजी चे १८.०० वा. चे दरम्यान, मौजे पिंपळगाव नदीवर ता. नायगांव जि. नांदेड येथे यातील **मयत नामे कैलाश अंकुश होटकर वय १७ वर्षे व्यवसाय शिक्षण रा. पिंपळगाव ता. नायगांव** हा नदीवर गेला असता पाय घसरुन पाण्यात बुडून मरण पावला. वगैरे **खबर देणार दशरथ गणपती होटकर वय ४५ वर्षे व्यवसाय मजुरी रा. पिंपळगाव ता. नायगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. नायगांव** आ.म्र. १२/२०१८ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ.म्र. दाखल असुन **तपास पोहेकॉ/१८६४ कुलकर्णी, मो.क्र. ७९७२७१०१०५** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४